## प्रेसनोट

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती

जा.क्र. ५४८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०८/२०१७

भंडारा:— पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. ०१/०८/२०१७ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु, अपर पोलीस अधीक्षक भंडारा रश्मि नांदेडकर यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. त्यांचे जिवण चारीत्र्य व कार्यप्रणालीबाबत माहीती देण्यात आली.

यावेळी अणाभाऊ साठे यांचा जन्म वाटेगाव ता. वाळवा. जिल्हा सांगली येथे झाला. वयाच्या अकराव्या वर्षी ते आपल्या वडीला सोबत २२७ कि मी चा पायी प्रवास करीत मुंबईला आले. त्यांनी त्याठिकाणी कामगार चळवळीत भाग घेवुन कम्युनिष्ट पक्षात सामील झाले १९४४ मध्ये लालबावटा कला पथकांची स्थापना करुन गोवा आंदोलनात जनजागृती करण्यासाठी संपुर्ण महाराष्ट्र ढवळुन काढला. त्यांचा मुळ पिंड शाहीराचा होता. त्यांनी बऱ्याच कांदबऱ्या कथा संग्रह लिहले असुन त्यांना 'फकीरा' या कांदबरीवर महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. अश्या थोर कलाकांराची आज आपण जंयती साजरी करीत आहोत.

यावेळी कार्यक्रमाला पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. व्ही. आर कुलकर्णी, पोनि. घुसर स्थागुशा भंडारा, पोनि. गाडे वानीशा भंडारा, सपोनि. सिडाम जिवीशा भंडारा, सपोनि. हत्तीमारे जिवीशा भंडारा, पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी सपोनि. कोडापे, पोलीस मुख्यालय पोलीस उपनिरीक्षक श्री. प्रधान साहेब, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

01.8

(एस. व्ही. कुलकर्णी)
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.